तत्काळ प्रकाशनासाठी
माध्यम संपर्क: ॲना शिलर, (+1) 202-419-4514, aschiller@pewresearch.org

# **कुटुंब आणि समाजामधील स्त्री-पुरुषाच्या भूमिकेकडे भारतीय कसे पाहतात**?

*महिलांना राजकीय पुढारी म्हणून भारतीय स्वीकारतात, पण कौटुंबिक जीवनात मात्र अनेक जण पारंपरिक स्त्री-पुरुष भूमिकांना पसंती देतात.*

**वॉशिंग्टन, डी.सी.(मार्च 2, 2022)** –अर्ध्या शतकापेक्षाही जास्त काळापूर्वी, पंतप्रधान म्हणून एका महिलेला निवडून देणाऱ्या जगातील अनेक देशांमधील भारत हा एक देश होता आणि सध्या देशामध्ये, एका प्रमुख राष्ट्रीय पक्षाच्या शीर्षस्थ असलेल्या सोनिया गांधींसह अत्यंत प्रभावशाली अशा अनेक राजकारणी महिला आहेत. आज बहुतेक भारतीयांचे म्हणणे आहे की, "सामान्यपणे महिला आणि पुरुष समानपणे चांगले राजकीय नेते बनतात," आणि संपूर्ण भारतभरात सुमारे 30,000 प्रौढांच्या नुकत्याच झालेल्या प्यू संशोधन केंद्राच्या सर्वेक्षणानुसार दहामधील एकापेक्षा अधिक लोकांना असे वाटते की "पुरुषांपेक्षा सामान्यपणे महिला *चांगल्या* राजकीय नेता बनतात." भारतीय प्रौढांपैकी केवळ एक चतुर्थांश लोक अशी भूमिका घेतात की "महिलांपेक्षा सामान्यपणे पुरुष चांगले राजकीय नेते बनतात."

तरीही, कौटुंबिक व्यवस्थेमध्ये, महिलांच्या तुलनेत पुरुषांच्या भूमिका जास्त महत्त्वाच्या असल्या पाहिजेत, असे म्हणण्याकडे भारतीयांचा कल आहे. दहापैकी सुमारे नऊ भारतीय ह्या विचाराशी सहमत आहेत की पत्नीने नेहमीच तिच्या पतीचे म्हणणे ऐकले पाहिजे; ह्यामधील सुमारे दोन तृतीयांश लोक ह्या विचाराशी *पूर्णपणे* सहमत आहेत. वर्ष 2019ची अखेर आणि 2020 ची सुरुवात (बहुतांश कोविड-19 च्या साथीपूर्वी) या दरम्यान घेतलेल्या एका सर्वेक्षणानुसार, पत्नींनी त्यांच्या पतींचे म्हणणे नेहमी ऐकले पाहिजे ह्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत, असे भारतीय पुरुषांच्या तुलनेत भारतीय महिला म्हणण्याची शक्यता थोडी कमीच आहे. (61% विरुद्ध 67%)

तरीही, स्त्री-पुरुषांच्या घरामधील काही भूमिकांबाबत अनेक भारतीय समतावादी विचार व्यक्त करतात. उदाहरणार्थ, 62% प्रौढांचे असे म्हणणे आहे की मुलांची काळजी घेण्याची जबाबदारी पुरुष आणि महिला दोघांचीही असली पाहिजे. परंतु, मोठ्या प्रमाणात जनसमुदायामध्ये अजूनही स्त्री-पुरुषांसाठी असलेल्या पारंपरिक  मूल्यांचा मोठा प्रभाव आहेःढोबळमानाने, एक-तृतीयांश (34%) प्रौढांना असे वाटते की मुलांच्या संगोपनाचे काम प्रामुख्याने महिलांनीच केले पाहिजे.

त्याचप्रमाणे, अल्प बहुमत (54%) म्हणते की अर्थार्जनाची जबाबदारी कुटुंबातील पुरुष आणि महिला दोघांचीही असली पाहिजे, परंतु बरेच भारतीय (43%) हे प्रामुख्याने पुरुषांचे कर्तव्य समजतात. आणि पुरुषांचे आर्थिक क्षेत्रातील निरंतर महत्त्व प्रतिबिंबित करताना भारतीय प्रौढ मोठ्या प्रमाणावर म्हणतात की जेव्हा नोकऱ्यांचा पुरवठा कमी असतो, तेव्हा पुरुषांना नोकरी मिळण्याचे अधिकार महिलांपेक्षा अधिक असले पाहिजेत. दहा पैकी आठ जण ह्या विचाराशी सहमत आहेत, ज्यामध्ये बहुसंख्य (56%) पूर्णपणे सहमत आहेत.

घरामध्ये, मुलगे आणि मुली दोन्ही असणे भारतीय महत्त्वाचे मानतातः जवळपास सर्वच भारतीयांचे म्हणणे आहे की किमान एक मुलगा (94%) आणि वेगळ्याने, किमान एक मुलगी (90%) असणे कुटुंबासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. आणि बहुतांश भारतीयांचे म्हणणे आहे की आईवडिलांकडून वारसा हक्क मिळण्याचे समान अधिकार (64%) आणि आईवडिलांच्या वृद्धपणी त्यांची काळजी घेण्याची समान जबाबदारी मुलगे आणि मुली दोघांचीही असली पाहिजे (58%).

परंतु दोन्ही बाबतीत, लोकं असे म्हणण्याची शक्यता जास्त आहे की ह्या क्षेत्रांमध्ये मुलींपेक्षा मुलांकडे अधिक जास्त अधिकार आणि जबाबदाऱ्या असल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, सुमारे दहापैकी चार भारतीय प्रौढ म्हणतात की वृद्ध आईवडिलांची देखभाल करण्याची पहिली जबाबदारी मुलांची असली पाहिजे, तर केवळ 2% हेच मुलींबाबत म्हणतात. ह्याशिवाय, बहुतांश भारतीय (63%), आईवडिलांचे अंत्यसंस्कार आणि दफनविधी ही - मुलींची नाही - तर प्रामुख्याने मुलांची जबाबदारी मानतात.

विविध ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक कारणांकरिता मुलींपेक्षा मुलांना अधिक जास्त महत्त्व देण्याकडे भारतीय कुटुंबांचा कल असतो - एक प्रथा जी "मुलाला प्राधान्य" म्हणून मोठ्या प्रमाणात ओळखली जाते. मुलाला प्राधान्य आणि अलीकडच्या दशकांमध्ये अल्ट्रासाउंडची वाढलेली उपलब्धता, बेकायदेशीर असूनही संपूर्ण भारतात नको असलेल्या स्त्रीभ्रूणांचा गर्भपात करण्याच्या प्रथेसाठी कारणीभूत ठरल्या आहेत. अनेक भारतीय किमान काही परिस्थितींमध्ये नको असलेल्या लिंगभ्रूणाचा गर्भपात स्वीकार्य मानतात. दहापैकी चार भारतीयांचे म्हणणे आहे की, "कुटुंबातील मुली आणि मुलांची संख्या संतुलित ठेवण्यासाठी आधुनिक पद्धतींचा वापर करून तपासणी करून घेणे" हे एकतर "पूर्णपणे स्वीकार्य" किंवा "थोडेफार स्वीकार्य" आहे, नको असलेल्या लिंगभ्रूणाच्या गर्भपाताविषयी अर्थसूचक शब्दप्रयोग. एवढ्याच प्रमाणाचे (42%) म्हणणे आहे की आधुनिक पद्धतींद्वारे कुटुंबातील मुली आणि मुलांची संख्या संतुलित ठेवणे हे पूर्णपणे *अस्वीकार्य* आहे, तर ढोबळमानाने दहापैकी एक जण ह्या प्रथेला "थोडेफार" अस्वीकार्य म्हणतो.

या प्रश्नावर तसेच या अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या इतर सर्व प्रश्नांवर पुरुष आणि महिलांमध्ये आणि सर्व वयोगटांमध्ये माफक मतभिन्नता आहे. दुसऱ्या शब्दांत, सामान्यतः भारतीय महिला भारतीय पुरुषांच्या तुलनेत, मुलाला प्राधान्य आणि स्त्री-पुरुष भूमिकांबाबत समानतावादी विचार व्यक्त करण्याची शक्यता जास्त नसते आणि हेच तरूण भारतीय प्रौढांच्या (वय 18 ते 34) बाबतीत त्यांच्या ज्येष्ठांच्या तुलनेत खरे आहे.

प्यू संशोधन केंद्रातर्फे, राष्ट्रीय स्तरावर 29,999 भारतीय प्रौढांच्या प्रत्यक्ष समोरासमोर घेतलेल्या एका सर्वेक्षणावर आधारित हा दुसरा अहवाल आहे. भारतातील सर्वेक्षणामधील अनेक निष्कर्ष हे "भारतातीलधर्मःसहिष्णुताआणिविलग्नता," मध्ये यापूर्वी प्रकाशित झालेले होते, ज्यांनी धार्मिक आणि राष्ट्रीय ओळख, धार्मिक आस्था आणि प्रथा, आणि धार्मिक समुदायांमधील दृष्टिकोन यांना तपशीलवार विचारात घेतले. सर्वेक्षणात भारतीय समाजातील स्त्री-पुरुष भूमिकांबाबतच्या अनेक प्रश्नांचा देखील समावेश केलेला आहे, परंतु यापूर्वीच्या अहवालामध्ये या प्रश्नांचे विश्लेषण केले गेले नव्हते आणि आता प्रथमच प्रकाशित केले जात आहेत. (अलीकडील दुसरा अहवाल "भारताचीधार्मिकसंरचना," मध्ये, स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताची धार्मिक रचना कशी बदलली आहे, याचे परीक्षण केले आहे.)

स्थानिक मुलाखतकर्त्यांनी 17 नोव्हेंबर 2019 आणि 23 मार्च 2020 दरम्यान 17 भाषांमध्ये सर्वेक्षण केले. सर्वेक्षणामध्ये भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचा समावेश करण्यात आला, अपवाद मणिपूर आणि सिक्किमचा, जिथे वेगाने वाढणाऱ्या कोविड-19 च्या परिस्थितीमुळे 2020 च्या उन्हाळ्यामध्ये फिल्डवर्क सुरू करण्यात अडचणी आल्या, तसेच अंदमान आणि निकोबार बेटे आणि लक्षद्विपचा दूरस्थ प्रदेश, ह्या प्रदेशांमध्ये भारतीय लोकसंख्येच्या 1% पैकी सुमारे एक चतुर्थांश लोक राहतात. जरी सुरक्षिततेच्या कारणांमुळे खुद्द काश्मिर प्रदेशात कुठलेही फिल्डवर्क झाले नाही, तरी जम्मू आणि काश्मिरच्या केंद्रशासित प्रदेशांचा सर्वेक्षणामध्ये समावेश करण्यात आला.

ह्या अभ्यासाला, द प्यूचॅरिटेबल ट्रस्ट्स आणि जॉन टेम्पलटन फाऊंडेशन द्वारे निधी पुरवण्यात आला. हा अभ्यास, जगभरातील धार्मिक बदल आणि त्यांचा समाजांवरील परिणाम समजून घेण्यासाठी प्यू संशोधन केंद्राद्वारे मोठ्या प्रमाणात केलेल्या प्रयत्नांचा एक भाग आहे.

संपूर्ण अहवालात लिंगविषयक भेदभाव समजून घेण्याची प्रक्रिया समाविष्ट आहे, जागतिक स्तरावर भारताच्या लिंगविषयक दृष्टिकोनांची तुलना कशी होते, लिंगविषयक दृष्टिकोनांमध्ये शिक्षण आणि धर्म यांचा जबरदस्त प्रभाव, भारतीय पुरुष आणि महिला यांच्यामधील तसेच निरनिराळ्या वयोगटाच्या प्रौढांमधील लिंगविषयक दृष्टिकोनाबाबतचे किमान फरक, आणि स्त्री-पुरुषांच्या भूमिकांकडे कसे पाहिले जाते यातील प्रादेशिक आणि राज्य-स्तरीय फरक.

हा अहवाल इंग्रजीमध्ये वाचण्यासाठी, येथे जा: https://www.pewforum.org/2022/03/02/how-indians-view-gender-roles-in-families-and-society

कार्यप्रणाली (इंग्रजीमध्ये): https://www.pewforum.org/2022/03/02/methodology-47

सर्वेक्षण टॉपलाइन (इंग्रजीमध्ये): https://www.pewforum.org/wp-content/uploads/sites/7/2022/02/PF_03.02.22_India_Gender_Topline.pdf

अभ्यासाबाबतच्या अधिक माहितीसाठी किंवा मुख्य संशोधक, संशोधन सहयोगी जोनाथन ईव्हान्स आणि संशोधनाच्या सहयोगी संचालक डॉ. नेहा सहगल यांच्याबरोबर मुलाखतीचे आयोजन करण्यासाठी कृपया ॲना शिलर यांच्याशी aschiller@pewresearch.org येथे किंवा +1-202-419-4514 यावर संपर्क करा.

###

प्यू संशोधन केंद्र हा वस्तुस्थिती मांडणारा एक निःपक्षपाती गट आहे जो जगाला आकार देणाऱ्या समस्या, दृष्टिकोन आणि कल यांविषयी लोकांना माहिती देतो. तो धोरणात्मक भूमिका घेत नाही. हे केंद्र 'द प्यूचॅरिटेबलट्रस्ट्स' यांची एक उपशाखा आहे, जे त्यांचे प्रमुख निधी पुरवठादार आहेत. आमच्या दैनिक आणि साप्ताहिक इमेल बातमीपत्रांना सबस्क्राइब करा.

*ह्या प्रसिद्धीपत्रकाचा त्याच्या मूळ इंग्रजी रुपामधून मराठीत अनुवाद करण्यात आला आहे.*